**ठळक बातम्या**

प्रधानमंत्री फ्रान्स आणि स्लोव्हाकिया दौऱ्यावर  रवाना/ भारत इनोव्हेट्स सोहळ्याचं उद्या करणार उद्घाटन

नवे लष्कर प्रमुख म्हणून लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्या नावाची घोषणा

पाच दिवसांच्या ब्रिक्स कृषी परिषदेची सांगता

आसाममधे हवाई दलाचं  विमान कोसळून पाच जवान शहीद

**आणि**

राष्ट्रीय अथलेटिक्स स्पर्धेत तेजस शिर्सेचा ११० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत नवा विक्रम

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी फ्रान्स आणि स्लोव्हाकिया दौऱ्यावर आज  रवाना झाले. देशाच्या धोरणात्मक संकल्पनेत फ्रान्सला विशेष स्थान आहे. आपल्या फ्रान्स भेटीत दोन्ही देशांमधले आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्यावर भर असेल, असं त्यांनी या दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. फ्रान्स भेटीत प्रधानमंत्री उद्या फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह दोन्ही देशांमधल्या नवोन्मेष वर्षानिमित्त आयोजित भारत इनोव्हेट्स या सोहळ्याचं उद्घाटन करतील.

नंतर प्रधानमंत्री उद्या दोन दिवसांच्या स्लोव्हाकिया दौऱ्यासाठी रवाना होतील. तिथे ते स्लोव्हाकियाचे अध्यक्ष पेलेग्रिनी आणि प्रधानमंत्री फिको यांची भेट घेतील. या दौऱ्यामुळे युरोपीय महासंघासोबतच्या भारताच्या धोरणात्मक भागीदारीला नवी ऊर्जा मिळेल, तसंच दोन्ही देशांमधल्या द्विपक्षीय संबंधांनाही नवी गती मिळेल असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

स्लोव्हाकियाचा दौरा आटोपून प्रधानमंत्री पुन्हा फ्रान्समधल्या एव्हियन इथं परत येतील. तिथे ते १६ आणि १७ जूनला जी सेव्हन देशांच्या शिखर परिषदेत सहभागी होतील.

यानंतर १८ जून रोजी पॅरिस भेटीनं प्रधानमंत्री आपल्या दौऱ्याचा समारोप करतील. तिथं ते फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासोबत विव्हाटेक ट्वेंटी ट्वेंटी सिक्स या आयोजनात सहभागी होतील.

<><><><><>

युद्धतंत्राच्या बदलत्या परिस्थितीत ड्रोन, उपग्रह आणि रोबोटिक्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याचं आवाहन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय हवाई दलात नव्याने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांना केलं. हैदराबादमधे डुंडीगल इथल्या हवाई दल अकादमीमध्ये आयोजित २१७ व्या तुकडीच्या 'संयुक्त दीक्षांत संचलना'च्या प्रसंगी ते बोलत होते. आधुनिक काळात युद्धपद्धतीत मोठे बदल झाले आहेत आणि अधिकाऱ्यांनी नवीन युद्धप्रणाली आणि रणनीतींबाबत स्वतःला सतत अद्ययावत ठेवलं पाहिजे, असंही ते म्हणाले. यावेळी संरक्षण मंत्र्यांनी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत प्रशिक्षण घेतलेल्या महिला कॅडेट्सच्या पहिल्या तुकडीलाही सेवेत समाविष्ट केलं.

<><><><><>

शाश्वत शेती, नवोन्मेषी संशोधन आणि तंत्रज्ञान हाच विकसित भारताचा पाया असल्याचं लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आयोजित ‘विकसित भारत आणि शेती’ या विषयावरच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्राला त्यांनी संबोधित केलं, त्यावेळी ते बोलत होतं. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा प्रवास शेती, शेतं आणि गावांमधून जातो, असं ते म्हणाले.

विज्ञान आणि संशोधनाचा आधार असलेली शेती ही काळाची गरज असल्याचं ते म्हणाले. कृषी क्षेत्रात दीर्घकालीन समृद्धी आणण्याच्या उद्देशानं आत्मनिर्भर कृषी मॉडेल्स विकसित करण्याकरता शिक्षक, शास्त्रज्ञ, संशोधक, धोरणकर्ते आणि शेतकऱ्यांनी एकत्रितपणं काम करायला हवं असं आवाहनही त्यांनी केलं.

<><><><><>

सरकारच्या विविध धोरणांमुळे आज भारतात जगातलं दुसऱ्या क्रमांकाचं सर्वात मोठं उच्च शिक्षण जाळं तयार झालं आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टवर म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या १२ वर्षांत देशात शिक्षण, कौशल्य, नाविन्यता आणि स्टार्टअप्सची एक नवी संस्कृती निर्माण केली, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविरोधात इंडिया आघाडीनं सुरु केलेल्या व्यापक राजकीय आणि वैचारिक लढ्याप्रति मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष वचनबद्ध असल्याचं महासचिव एम. ए. बेबी यांनी म्हटलं आहे. ते केरळात थ्रीसूर इथं बातमीदारांशी बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नियंत्रणाखाली असलेल्या भाजपचा पराभव करणं हेच पक्षाचं पहिलं कर्तव्य असल्याचा प्रस्ताव पक्षाच्या याआधीच्या अधिवेशनात संमत झाला होता, आणि तेच पक्षाचं धोरण असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. या दृष्टीकोनातूनच, काँग्रेससोबत राजकीय मतभेद असले तरी, परस्पर सामायिक राजकीय लढा पुढे नेण्यासाठी काँग्रेससोबत सहकार्य करणं आवश्यक असल्याचं पक्षाचं मत आहे असं ते म्हणाले.

<><><><><>

मध्य प्रदेशातल्या राज्यसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवार मिनाक्षी नटराज यांचा अर्ज बाद करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयासाठी कारणीभूत ठरलेली नोटीस तेलंगणातल्या न्यायालयानं रद्द केली आहे, अशा वेळी ही निवडणूक रद्द करून पुन्हा निवडणूक घ्यायला हवी असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. या पार्श्वभूमीवर नटराजन यांचा निवडणूक लढवण्याचा अधिकार हिरावून घेणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याविरोधात काय कारवाई करणार असा सवालही त्यांनी विचारला आहे.

<><><><><>

नवे लष्कर प्रमुख म्हणून लष्कर उपप्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्या नावाची घोषणा संरक्षण मंत्रालयाने केली आहे. सध्याचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी येत्या ३० जूनला सेवानिवृत्त होत असून त्या दिवशीच नवे लष्करप्रमुख पदभार स्वीकारतील. पुण्याजवळ खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत सेठ यांचं शिक्षण झालं आणि १९८६ पासून ते सशस्त्र दल सेवेत आहेत. सुदर्शन चक्र या लष्कराच्या व्यूहाचं नेतृत्व त्यांनी केलं आहे.

<><><><><>

ब्रिक्स राष्ट्रे जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास निम्म्या लोकसंख्येचं प्रतिनिधित्व करतात आणि जागतिक कृषी उत्पादनात सुमारे ४२ टक्के वाटा उचलतात, अशी माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. ते आज मध्य प्रदेशातील

इंदूर इथं आयोजित पाच दिवसीय ब्रिक्स कृषी परिषदेच्या सांगता समारंभात 'इंदूर जाहीरनामा' एकमताने स्वीकारण्यात आल्यानंतर बोलत होते. 'इंदूर जाहीरनामा' हा केवळ कराराचा दस्तऐवज नसून तो ब्रिक्स राष्ट्रांच्या सामूहिक इच्छाशक्तीचं आणि सामायिक जबाबदारीचं प्रतीक आहे, असंही ते म्हणाले. शेवटच्या दिवशी या जाहीरनाम्यात अन्नसुरक्षा, शेतकरी कल्याण, हवामान-पूरक शेती, कृषी व्यापार आणि डिजिटल शेती यांबाबतच्या महत्त्वपूर्ण निर्णयांची रूपरेषा मांडण्यात आली.

**<><><><>**

भारतीय हवाई दलाच्या एएन ३२ या मालवाहू विमानाचा आसाम इथं आज सकाळी अपघात झाला, यात हवाई दलाचे पाच जवान शहीद झाले.

स्कॅड्रन लीडर प्रशांत सिंग, फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार, सर्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीर खेमराम कुमावत आणि दानिश आलम अशी त्यांची नावं आहेत.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. या जवानांचं धैर्य आणि देशसेवा सदैव स्मरणात राहील असं ते म्हणाले.

हवाई दलानेही जवानांच्या मृत्यूबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. या अपघाताचं कारण शोधण्यासाठी एका चौकशी समितीची स्थापना करण्यात येणार असल्याचंही हवाई दलाने सांगितलंय.

**<><><><>**

महाराष्ट्रात लातूर–नांदेड महामार्गावर चाकूर तालुक्यातील आलगरवाडी पाटीजवळ काल झालेल्या अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला तर इतर दोन गंभीर जखमी झाले आहेत. कंटेनर, कार आणि दुचाकी यांच्यात झालेल्या या अपघातात दुचाकीवरील दोघांचा तर कारमधील एका लहान मुलाचा जागीच मृत्यू झाला. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांची प्रकृती गंभीर आहे.

**<><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेनं परीक्षा अधिकाऱ्यांच्या क्षमता वृद्धीसाठी परीक्षा कर्मयोगी हा कार्यक्रम राबवण्याची घोषणा केली आहे. संस्थेच्या वतीनं घेतल्या जाणाऱ्या परीक्षांशी संबंधित यंत्रणांची क्षमता वाढवणं, प्रक्रियात्मक अनुपालन तसंच परीक्षा केंद्रांच्या बाबतीतलं उत्तरदायित्व यात सुधारणा घडवणं, कार्यक्षमतेत सुधारणा घडवणं, तसंच ऑफलाईन

स्वरुपात होणाऱ्या लेखी परीक्षा सुरुळीतपणे पार पाडल्या जातील याची सुनिश्चिती करणं या उद्देशानं हा कार्यक्रम राबवला जाणार असल्याचं संस्थेनं म्हटलं आहे.

या परिक्षा कार्यक्रमाचा अभ्यासक्रम आयगॉट कर्मयोगी भारत या डिजीटल व्यासपीठावर  उपलब्ध करून दिला जाणार आहे. हा कार्यक्रम चार सत्राचा असेल.

**<><><><>**

इराणने अणुऊर्जेचा नागरी वापरासाठीचा कार्यक्रम राबवायला हरकत नसल्याचं ट्रंप प्रशासनानं म्हटलं आहे. इराणबरोबरच्या अणुकरारात तसं कलम समाविष्ट करायला हरकत नाही, मात्र त्यापूर्वी इराणला अण्वस्त्र तयार करता येणार नाही अशा रीतीने तिथल्या पायाभूत सुविधा नष्ट केल्या पाहिजेत अशी अट अमेरिकेने घातली आहे. दोन्ही देशांमधे शांतता कराराची बोलणी चालू असून त्यातला काही तपशील अमेरिकेच्या सूत्रांनी काल उघड केला. तहातल्या कलमांनुसार इराणला अण्वस्त्रनिर्मितीसाठी लागणारी सामुग्री नष्ट करावी लागेल, तसंच अणुप्रकल्पांची वेळोवेळी तपासणी करुन घ्यावी लागेल.

**<><><><>**

पाकिस्तानव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधलं आंदोलन आता तीव्र झालं आहे. इस्लामाबाद प्रशासन या भागावर थेट ताबा मिळवणार, अशी भीती लोकांना वाटत आहे. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी आंदोलकांसोबत चर्चेचा प्रस्ताव ठेवला पण जॉइंट अवामी अॅक्शन कमिटी'नं  हा प्रस्ताव धुडकावून लावला आहे. ही चर्चा म्हणजे वेळेचा अपव्यय असल्याचं आंदोलकांचं म्हणणं आहे.

**<><><><>**

पंजाबमधल्या गुरु नानक स्टेडियमवर सुरु असलेल्या इंडियन अॅथलेटिक्स सिरीज नऊ या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरच्या तेजस शिर्से यानं आज पुरुषांच्या ११० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत नव्या राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली. तेजसनं केवळ तेरा सेकंद सत्तावीस मिलीसेकंदात हे अंतर कापलं. त्यानं यापूर्वीचा तेरा सेकंद एक्केचाळीस मिलीसेकंदाचा स्वतःचाच जुना राष्ट्रीय विक्रम मोडला. या कामगिरीमुळे तेजस याच वर्षी होणार असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठीही पात्र ठरला आहे.
या हंगामातली आशियाई खेळाडूंमधली पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीतली ही सहावी सर्वात वेगवान वेळ ठरली आहे.

**<><><><><>**

धर्मशाला इथं भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात, अफगाणिस्ताननं भारतासमोर विजयासाठी १९५ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. पावसाच्या व्यत्ययामुळे २५ षटकांच्या केलेल्या या सामन्यात, भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. अवघ्या २६ धावांवर अफगाणिस्तानचे तीन प्रमुख गडी बाद झाले होते. त्यानंतर सलामीवीर रहमानुल्ला गुरबाझनं मैदानावर चौफेर फटकेबाजी करत अवघ्या ५१ चेंडूत ८ चौकार आणि ८ षटकारांसह १०२ धावांची शतकी खेळी केली. अफगाणिस्ताननं २४ षटकं ५ चेंडूत सर्वबाद १९४ धावा केल्या.

**//<><><><><>//**